# एक प्रसन्न व्यक्तिमत्व : संध्या कर्णिक



**मा**झी आणि संध्याची ओळख झाली १९९९ च्या बृहन् महाराष्ट्राच्या सॅनहोजेच्या अधिवेशनांत. मी, माझी पत्नी शमा आणि माझी नात स्वाती असे तिघे अधिवेशनाला गेलो. अुद्देश दोन ! अधिवेशनाची धमाल बघायची, भाषणे ऐकायची, मस्त जेवायचे आणि ओळखीच्या जुन्या मित्रांना भेटायचे. दुसरे कारण..जास्त महत्वाचे... वर संशोधन.. नातीसाठी नातजांवई शोधणे अथवा तिला नवरा शोधण्यास हस्ते परहस्ते मदत करणे. हुषार नात! तिनं आपला नवरा शोधलाच की तिथं ..डॉक्टर. ते जाअू दे.. मुद्दा असा की या अधिवेशनांत आम्ही बसलो तिथंच समोरच्या रांगेत एक मध्यम अुंचीची, नाकी डोळी रेखीव अशी बाई बसली होती. माझ्या बायकोचं तिच्याकडं लक्ष होतं. कां कुणास ठाअुक ?

ही खालच्या आवाजांत म्हणाली, " अहो असे काय वेंधळ्यासारखे इकडेतिकडे टकामका बघताय् ? आपल्या समोरच ती पहा बसलीय..संध्या..संध्या कर्णिक..तिचीच विचारपूस चालली होती नां मगापासनं !"

"अगो..ती ..ती संध्या ? छट्..ती असणंच शक्य नाही! संध्या मोठी बाई असणार.. वयस्कर.. पन्नाशीमधली.... ही तर पोरगेलीशीच दिसते ?"

" जा..नाही ना पटत माझं नेहमी सारखं ? मीच जाऊन तिला विचारते. तुम्ही "संध्या -कर्णिकच ना ?"

बायको तरातरा उठली आणि गेली की विचारायला.

नाही तरी बायका घरांत झुरळाला भितील. पण दुसऱ्या बाईची ओळख काढायला कधीच भिणार नाहीत. कारण ? बाईच्या वाटा बाईलाच जास्त माहीत !

मी चटकन जागेवर उभा राहिलो. सीट गेली तर दुसरा कुणी पटकवायचा ही भीती.

बायकोचा होरा बरोबर होता. 'ती' संध्या कर्णिकच होती.

अशी आमची ओळख झाली.

संध्या कर्णिक.. रेखीव आणि सडपातळ आणि तिचं हासू सबंध जिवणीभर पसरणारं

होतं.  बराच वेळ गप्पा झाल्या.  ती मराठी लिखाण करते हे मला माहीत होतं. कारण त्यावेळी मी ह्यूस्टन मराठी मंडळाच्या 'स्नेह' दिवाळी अंकाचे संपादन करत असे.  त्या अनुषंगाने मी संध्या कर्णिकडून लिखाणही मागवीत असे.  तिच्या लिखाणाचा सूर आणि संदर्भ माझ्या चांगलाच लक्षांत होता.  स्वच्छ आणि स्पष्ट लिहिणारी हो लेखिका होती.

त्या तीन दिवसांत संध्याची चुटपुटती भेट होत होती.  ती त्या बी.एम.एम. कमिटीची कार्यकर्ती होती आणि त्या संमेलनाची प्रमुख सूत्रसंचालक होती.

ह्यूस्टनला परत आल्या नंतर मला एका 'संध्या–कर्णिकचा' फोन आला.  मला वाटलं की 'तीच' ही 'संध्या', .. जी नुकतीच मला कॅलिफोर्नीयाला भेटलेली.  मी तिला काही नवीन लिहिलं कां म्हणून विचारलं.

ती म्हणाली, "मी आतांच एक आईला पत्र टाकलनं अंधेरीला".

मी चक्रावलो. विचारलं,

" अग, तूच नां ती संध्या कर्णिक आम्हाला सॅनहोजेला भेटलेली, अधिवेशनांत ?"

" दादा, काही तरी घोटाळा होतोय तुमचा.    मी संध्या कर्णिक ..अशोकची बायको.   मी तर पेनसिल्हीनियाला राहाते.  ती कॅलिफोर्नियात राहाणारी 'संध्या कर्णिक' माझी जाऊ लागते आणि आम्ही एकमेकींना चांगल्या ओळखतो"

आता माझ्या डोक्यांत प्रकाश पडला.

जरा उशीरा कां होईना. पण पडला ! दोन संध्या कर्णिक ! एक कॅलिफोर्नियाची आणि दुसरी पेनसिल्हीनियामधली.  जवळजवळ एकाच वयाच्या आणि दोघी बोलक्या.

त्या नंतरच्या काही वर्षात मी संध्या कर्णिक, (कॅलिफोर्निया) लेखिका हिची जास्त माहिती मिळवली.

१९६९ साली मुंबई विद्यापिठाचे मराठीचे सुवर्णपदक मिळवलेली ही विदूषी, १९७० साली लग्न करून प्रथम फिलाडेल्फीयात आली.  मराठीची आवड लहानपणापासून.  कारण चाळीतच काकानं लायब्ररी काढलेली व त्यातली दोन तीनशे पुस्तकं हिनं आवडीनं वाचून काढलेली.  शिवाय घरांत चांदोबा, बालमित्र, शिशुरंजन, अमृत ही मासिके यायची.  हातांत पडेल ते पुस्तक वाचून काढण्याचा सपाटा लावल्यामुळे बाबूराव अर्नाळकरांपासून ते थेट जगाचा इतिहास आणि भूगोलाची पुस्तकं सुध्दां वाचून झालेली.  मग त्या पुस्तकांवर बाबांच्या बरोबर चर्चा ! हा उद्योग वडीलांकडून चांगली चांगली पुस्तके मिळविण्याच्या हेतूनं चालायचा. त्यामुळं हिनं लहानपणीच शरदचंद्र चॅटर्जी, गो.नी. दांडेकर, पु.भा.भावे, रणजीत देसाई, ड्युमाच्या कादंबऱ्या यांचा वाचून फडशा पाडला.  नंतर जयवंत दळवी, श्री.ना.पेंडसे,

आवडते लेखक म्हणजे पु.ल., जी.ए. कुळकर्णी आणि प्रकाश संत हे होत.

केव्हातरी मी एकदा विचारलं की संध्या, तुझा हा वाचनाचा नाद म्हणजे एक करमणूकीचा भाग वाटत असेल नाही तुला ? तर संध्या काय म्हणाली की तिचं वाचन आणि लेखन हे केवळ विरंगुळ्याच्या पातळीवर आता राहिलं नव्हतं. आयुष्यांतले सुख दुःखाचे क्षण, प्रसंग लिहून काढले की मोकळं वाटतं मनाला. या प्रक्रियेमुळे मनाचा निचरा व्हायचा. प्रसिध्दीसाठी लिखाण पाठवावं असं सुध्दां कधी मनांत आलं नाही माझ्या.

प्रत्येकाच्या आयुष्यांतील सर्वच वर्षे काही सुखाची जातात असं नाही. काही चांगली तर काही वाईट. त्यांत सुध्दा आयुष्याचा काही काळ, काही वर्षे फारच आनंदाची गेलेली असतात. त्यांची गोडी अवीट असते. मला समजून घ्यायचं होतं की संध्याच्या आयुष्यांतील कोणती वर्षे तिनं खूप आनंदात, सुखांत घालविली. ती सांगू लागली,

"दादा, १९६५ ते १९६९ ही रूईया कॉलेजमधील चार वर्ष ही माझ्या आयुष्यांतली अत्यंत आनंदाची वर्ष. वसंत बापट, सरोजिनी वैद्य, सदानंद रेगे हे साहित्यिक शिक्षक मला लाभले. बापटसर आणि सरोजताईमुळे मराठीतले रथी-महारथी लेखक मला जवळून बघायला, ऐकायला मिळाले. आम्ही सर्व १६-१८ वर्षाचे, कमालीचे उत्सुक आणि नम्र विद्यार्थी आणि आमच्या भेटी झाल्या त्या कवी अनिल, बोरकर, करंदीकर, पाडगांवकर, ग.दि.मा., गंगाधर गाडगीळ, वा.ल.कुळकर्णी, सोपानदेव चौधरी, शांता शेळके, नारायण सुर्वे, विजय तेंडुलकर, पु.शि.रेगे, विजया राजाध्यक्ष आणि अर्थात पु.ल.देशपांडे अशा विख्यात साहित्यिकांशी. शिवाय रूईयामधल्या दोन अविस्मरणीय भेटी मी तुम्हाला सांगते. त्यातली पहिली भेट म्हणजे नाथ पै यांची आणि दुसरी कुमार गंधर्वांची. या दोघांना मला जवळून पाहता आलंच, पण त्यांचेबरोबर बसून बोलताही आलं. याचं केव्हढं अप्रूप मला वाटलं याची तुम्हाला कल्पना येणार नाही. आयुष्य उजळून जातं म्हणजे काय याची प्रचिती आली. हा माझ्या आयुष्यांतला सोन्याचा क्षण होता."

"मग अमेरिकेत आल्यावर तू तुझं वाचन लिखाण चालू ठेवलं असशीलच की ?"

"हो तर. मी अमेरिकेत आल्यावर चांगलं इंग्रजी साहित्य, उत्तम चित्रपट आणि symphony music याचा खजिनाच मला लायब्ररीमधे सांपडला. वाचनाने आणि लेखनाने आनंदाची दारं पुन्हा पुन्हा उघडली. आपलं लिखाण चार मित्रमैत्रीणींना वाचून दाखवण्यांत किती आनंद मिळतो हे काय तुम्हाला माहीत नाही ? मुद्दाम त्याच्या पलीकडे जाऊन, प्रसिध्दी मिळावी असं मुळीच वाटत नाही. कधीतरी कुणीतरी अपरिचित, शाबासकी देणारं पत्र पाठवतो. त्यानं किती बरं वाटतं मनाला!"

"अगदी मनापासून तू बोललीस तू संध्या! तुझ्यातली निर्मळता आणि प्रामाणिकपणा मला खूप आवडतो. तरी सुध्दां मला एक प्रश्न विचारायचाय. आम्ही सावलीमधून तुझ्या कथा प्रसिध्द केल्यात. 'एकता' मधल्या कथाही मी वाचल्यात. बृहन महाराष्ट्र वृत्तांत सॅनहोजेच्या अधिवेशनानंतर लिहिलेला तुझा परखड लेखही मला आठवतोय. पण याव्यतिरिक्त तुझं लिखाण कुठंकुठं प्रसिध्द झालं?"

"'साधना,' 'मिळून साऱ्या जणी', 'अंतर्नाद', 'माहेर', 'अक्षर' या महाराष्ट्रांतील मासिकांत माझे ललितलेख आणि कथा प्रसिध्द झाल्यात. "कुंपणा पलीकडचे शेत" या पुस्तकांत माझी कथा आहे. "कुणास्तव कुणीतरी" हा कथा संग्रह साधना प्रकाशन, पुणे यांनी प्रसिध्द केलाय. विद्या हर्डिकर सप्रे बरोबर "निरंतर" या पुस्तकाचं संपादनही केलं आहे."

शेवटचा प्रश्न तुला विचारायचाय तो असा. "अमेरिकेत आणि कॅनडांत राहाणाऱ्या मराठी भाषिक साहित्यिकांनी एकमेकांशी संबंध ठेवणे, विचारांची देवाणघेवाण करणें कसे शक्य आहे?"

"दादा, उत्तर अमेरिकेत राहाणाऱ्या मराठी लेखकांचा नियमितपणे संवाद साधण्यासाठी आणि सतत संपर्क रहाण्यासाठी काहीतरी Net working असावं असं मला मनापासून वाटतं."

संध्या कर्णिकचं व्यक्तिमत्व फुललेल्या कमळासारखं आहे. तिचं बोलणं, चालणं उत्साहाचं असतं. ती नैराश्यवादी वाटत नाही. Positive thinking हा तिचा स्थाईभाव आहे आणि तशीच तिची attitude मी पाहिली आहे.

ती गेली आठ वर्ष Hospice साठी विनामूल्य श्रमदान करीत आहे. ही तिची प्रेरणा अंतर्यामीची आहे आणि म्हणूनच या अनुभवांविषयी तिचा लिहिण्याचा विचार आहे. रशियन, इराणी आणि दक्षिण अमेरिकेतल्या साहित्या विषयी तिच्या मनांत कुतूहल आहे. कदाचित त्या अनुषंगाने तिच्या हातून काही भरघोस लिखाण निर्मिती होईल अशी मला आशा आहे.

हे सांगत असताना मला आठवतंय.

संध्या कर्णिकांच्या एका अप्रतीम ललित लेखांच्या संग्रहाचं नांवच मुळी "दिवा कुणाचा तेवत राही" असं आहे. हा योगायोग नाही कां?"

शब्दांकन : दिवाकर कारखानीस – ह्युस्टन
email : dkarkhan80@gmail.com

(भिसे, कारखानीस कुटुंबीय आणि "मायबोलीचा विश्वसेतू" च्या सह-संपादकांच्या परवानगीने "मायबोलीचा विश्वसेतू" या पुस्तकातून)